# रोटरॅक्ट क्लब ऑफ गोदावरी इलाईट तर्फे 'श्वास' एक पेड माँ के नाम प्रकल्पाला उस्फूर्त प्रतिसाद !

जळगाव - रोटरॅक्ट क्लब ऑफ गोदावरी इलाईट व रोटरी क्लब ऑफ जळगाव इलाईट RID3030 यांच्या संयुक्त विद्यमानाने 'श्वास' एक पेड माँ के नाम हा कार्यक्रम गोदावरी व्यवस्थापन महाविद्यालया समोरील परिसरात पंधरा फूट उंचीची 50 झाडे लावण्यात आली, दोन फूट बाय दोन फूट खड्डा करण्यात आला त्यात काळी माती व कंपोस्ट खत टाकण्यात आले. या कार्यक्रमास डॉ. केतकीताई पाटील, डिस्ट्रिक्ट गव्हर्नर डॉ. राजेश पाटील, रोटे. अजित महाजन, रोटे. संजय तापडिया, प्रा. सौ .नीलिमा चौधरी, महाविद्यालयाचे संचालक रोटे डॉ. प्रशांत वारके, सेक्रेटरी. हरगोविंद मनियार, सौ. मनीषा खडके, दिनेश तिवारी, श्रीराम परदेशी, डॉ. नीलिमा वारके आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. केतकीताई पाटील यांनी पर्यावरणासाठी आपण काहीतरी देणे लागतो झाड लावणे हे देखील महत्त्वाचे आहे पण त्यापेक्षाही झाडाची काळजी घेणे पण महत्त्वाचे आहे उन्हाळ्यात झाडांची काळजी घ्यावी त्याला पूर्णपणे जगवावे.

प्रमुख पाहुणे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर 2026-27 डॉ. राजेश पाटील यांनी बोलताना सांगितले की पर्यावरण हे खूप महत्त्वाचे आहे या समतोलासाठी झाडे लावली पाहिजे यावेळेस 50 झाडे लावण्यात आली मागच्या वर्षी लावण्यात आलेली झाड तुम्ही बघू शकता या ठिकाणी आहे, अतिशय सुंदर असे व्यवस्थापन या ठिकाणी करण्यात आलेले आहे त्यासाठी मी डॉ. प्रशांत वारके सरांचे आभार मानतो.

रोटे. डॉ. प्रशांत वारके सरांनी बोलताना खूप आनंद होत आहे प्रत्येक झाड हे मोठे 15 फूट उंचीचे आहे, झाडाला नंबर देखील दिलेला आहे यावर्षी 50 झाडे लावली पुढच्या वर्षी अजून काही झाडे लावण्याचे नियोजन आहे, अतिशय सुंदर असा हा कार्यक्रम मातोश्रींच्या नावे व मातोश्रींच्या हस्ते झालेला आहे.

या कार्यक्रमास 'श्वास' असे नाव देण्यात आले, कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन रोटे. डॉ. प्रशांत वारके यांनी केले.